॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ७ ( ) मुंबई दादर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या २६ जानेवारी, २०१९ रोजी राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पाच स्वयंसेवकांची निवड होवून त्यात ते सहभागी झाले होते. यात तीन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींचा समावेश होता.

शिवाजी पार्क दादर, मुंबई येथे दि.२६ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलनासाठी विद्यापीठाच्या पाच स्वयंसेवकांची (मुले व मुली) निवड होवून ते सहभागी झाले होते. त्यात अभिनव पाकळे (एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे), अक्षय साळुंखे (ए.आर.डी.ए.एस.चे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी), मिथिलेश भिडे (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर), मयुरी पाटील (झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे) व कांचन चव्हाण (समाजकार्य विभाग,सामाजिकशास्त्र प्रशाळा, कबचौ उमवि, जळगाव) यांचा दि.१७ ते २६ जानेवारी, २०१९ दरम्यान सराव व प्रत्यक्ष संचलनात सहभाग होता. सहभागी झालेल्या या रासेयोच्या स्वयंसेवकांनी विविध शिबीरात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनिय कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.एस.टी.इंगळे, दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, प्राचार्य एल.पी.देशमुख, दिपक पाटील, संचालक रासेयो डॉ.पंकजकुमार नन्नवरे, संचालक विद्यार्थी विकास प्रा.सत्यजित साळवे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल यांनी व संबंधित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी